सीमाभागातील मराठी जनतेचे मुखपत्र

# तरुण भारत

बेळगाव

www.tarunbharat.com

आजच्या अंकासोबत खज़ाना

बुधवार दि. ३१ डिसेंबर २०१४





## लोणावळ्यात मोटोक्रॉस, डर्ट बाईक्स, बंजी जंपिंगचा थरार

फ्लाईंग फॉक्स... डर्ट बाईक्स... मोटोक्रॉस... बंजी जंपिंग यांसारख्या साहसी खेळांचा अनुभव लोणावळ्यात पर्यटक घेत आहेत. नवीन वर्षाच्या निमित्ताने या खेळांना भरघोस प्रतिसाद मिळत आहे. नव वर्षाच्या स्वागतासाठी लोणावळ्यात पर्यटकांची गर्दी झाली असून, सर्व हॉटेल्स आणि रिसॉर्टस् फुल्ल झाली आहेत. या पर्यटकांसाठी विविध आकर्षणे, सवलती, योजना हॉटेल्सवाले देत आहेत. डेल्ला ॲडव्हेंचर आणि डेल्ला रिसॉर्टमध्ये यानिमित्ताने साहसी क्रीडाप्रकारांचे आयोजन करण्यात आले आहे. रिसॉर्ट असलेल्या ७० हून अधिक साहसी उपक्रमांमध्ये न्यूझीलंडमधील प्रशिक्षित इन्स्ट्रक्टर्सच्या मार्गदर्शनाखाली बंजी जंपिंग, स्वूप स्विंग, मोटोक्रॉस, एटीव्ही राईड्स, देशातील सर्वांत जास्त लांबीचे फ्लाईंग फॉक्स, ॲक्वा झोर्बिंग याचा अनुभव पर्यटक घेत आहेत. ख्रिसमस व नववर्षानिमित्त डेल्लाने ४ जानेवारीपर्यंत विशेष सवलत योजना सुरू आहे.